# टीमने अण्णांना पक्षीय राजकारणात ओढले : परुळेकर

**नवी दिल्ली : पुढारी न्यूज नेटवर्क**

हिस्सार पोटनिवडणुकीत अण्णांना काँग्रेसविरोधी प्रचार करावयाचा नव्हता; परंतु अरविंद केजरीवाल, प्रशांत भूषण व किरण बेदी यांनी त्यांना पक्षीय राजकारणात ओढले, असा सनसनाटी आरोप अण्णांचे माजी ब्लॉग लेखक राजू परुळेकर यांनी आज नवी दिल्लीत केला. याप्रकरणी कोणतीही प्रतिक्रिया देण्यास अण्णांचे स्वीय सहायक सुरेश पठारे यांनी स्पष्टपणे नकार दिला.

अण्णांना पक्षीय राजकारणात रस नव्हता, असे सांगताना परुळेकर म्हणाले की, हिस्सारमध्ये जाणे टाळण्यासाठीच अण्णांनी मौनव्रत धारण केले. भूषणद्वयी, केजरीवाल व बेदी हे चौघे अण्णांवर दबाव टाकतात. त्यांच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी अण्णांना पुढे करतात. आमची संमती घेतल्यानंतरच ब्लॉग अपडेट करावा, असे या चौकडीने वारंवार मला सांगितले.

अण्णांच्या प्रकृतीविषयी चिंता व्यक्त करीत परुळेकर म्हणाले की, उपोषणानंतर अण्णांची प्रकृती सुधारली नाही. डॉक्टरांनी प्रवासास सक्त मनाई केली, तरी ही चौकडी अण्णांना पाच राज्यांच्या दौऱ्यावर नेण्याचा हट्ट करीत होते. त्यामुळे वैतागून अण्णांनी कोअर समिती बरखास्त करण्याचा निर्णय खासगीत घेतला होता. नव्या समितीतून या चौकडीला बाहेर ठेवणार असल्याचा अण्णांचा मनोदय होता, असेही परुळेकर यांनी स्पष्ट केले आहे. उपोषण केल्याशिवाय जनलोकपाल विधेयक मंजूर होणार नाही, असे सांगत अण्णांना उपोषण करण्यास या चौकडीने भाग पाडले, असा खुलासा परुळेकर यांनी केला.